विशेष घटक योजनेअंतर्गत दलित
वस्ती कार्यक्रमामधून हाती घेण्यात
येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा
कार्यक्रमासाठी लोकवर्गणी

उपाभ3 (ओ)

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- ग्रापापु-१००५/प्रक्र- ६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांकः- २४ जानेवारी, २००५**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/ पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
(२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००१/प्रक्र-१९०/ पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१
(३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/ पापु-०७, दिनांक २३ मार्च, २००२.
(४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक २२ ऑगस्ट, २००३
(५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक ८ ऑक्टोबर, २००३
(६) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक ५ जानेवारी, २००४

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाचे सुधारित धोरण संदर्भिय क्र.१ येथील दिनांक २७.७.२००० च्या शासन निर्णयान्वये संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात आल्यानंतर या सुधारित धोरणातील लोकसहभागाचे तत्व स्पष्ट करुन त्याअनुषंगाने धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संदर्भिय क्र.२ येथील दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत आदिवासी क्षेत्रामध्ये हाती घेण्यात येणा-या योजनांसाठीची लोकवर्गणी संदर्भिय दिनांक ५ जानेवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये ५% करण्यात आली आहे.

त्यामुळे राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत विशेष घटक योजने अंतर्गत दलित वस्ती सुधारणा कार्यक्रमधून हाती घेण्यात येणा-या योजनांसाठीची लोकवर्गणी ५% करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत विशेष घटक योजने **अंतर्गत दलित वस्ती सुधारणा कार्यक्रमामधून** संबंधित दलित वस्ती करिता हाती घेण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठीची **लोकवर्गणी किमान ५ %** करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. ही लोकसहभागाची ५% रक्कम पूर्णतः रोख स्वरुपात अथवा अंशतः रोख व उर्वरित भाग श्रमदान अथवा वस्तुदान या स्वरुपात जमा करावयास मुभा देण्यात येत आहे. मात्र, किमान १% रक्कम रोख स्वरुपात असली पाहिजे व ती योजनेला मंजूरी देण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित ४% रक्कम श्रमदान अथवा वस्तूदान या स्वरूपात देण्यात याव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सर्व)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सार्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
तहसिलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, .मुंबई
सामाजिक न्याय व सां. का. व क्रि. विभाग ,मंत्रालय,मुंबई.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
मंत्रालयातील सर्व इतर विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

- - - - - -

\\Ws07\D\New Folder\GR-SCP PUBLIC CONTRIBUTION CR--1005.doc

एच-867 -।अ.